पाहिजेत !! राजेंद्र कुमार : ९४२२६७५१६४
एखादे कुटुंब हवे आहे, जे शेती काम करतील. माझ्या घरातील व शेतीवरील कामात caretaker म्हणून काम पाहतील.
प्रथम पगार रुपये ८,०००/- ते रुपये १५,०००/- प्रतिमाह
एका मुलाचा शालेय शिक्षण खर्च समाविष्ट
गाईचा गोठा सर्व कामे : दूध काढणे, चारा देणे, गोठ्यात इतर कामे...
शेतीवरील काम : शेतीवरील कामात लक्ष देणे, पाणी पंप सुरू करणे व शेताला पाणी पुरवठा करणे, माणसे काम करतील ते पाहणे व ईतर काही कामे.
राहण्याची सोय आहे... ५ वर्षे करार असेल...
गाव : लोणविरे तालुका : सांगोला जिल्हा : सोलापूर

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३५८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.०८ ऑगस्ट २०२५




## राजकारणात खळबळ! महिलांचे अश्लील व्हिडीओ, ड्रग्ज ते रॅकेट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, पुणे :** राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नेत्या तथा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आज पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांच्यावर अतिशय गंभीर आरोप केले आहेत. पुणे पोलिसांनी काही दिवसांपूर्वी खराडी येथे एका हॉटलेच्या रुममध्ये धाड टाकली होती. तिथे त्या रुममध्ये रेव्ह पार्टी सुरु होती. त्यावेळी एका म हिलेच्या पर्समध्ये अंमली पदार्थ सापडल्याचा दावा करण्यात आला होता. या पार्टीत दोन मुलींचा समावेश होता. पोलिसांनी आरोपींसह दोन महिलांनादेखील ताब्यात घेतलं होतं. या घटनेत मुख्य आरोपी एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर आहेत. या प्रकरणी पोलिसांचा तपास सुरु आहे. या तपासात खळबळजनक माहिती समोर आल्याची माहिती रुपाली चाकणकर यांनी दिली. चाकणकर यांनी यावेळी अतिशय खळबळजनक आरोप केले. त्यांनी केलेले आरोप आपण १० मुद्द्यांमध्ये समजून घेऊयात.

**१)** पोलिसांनी प्रांजल खेवलकर यांचा मोबाईल तपासला. त्यामध्ये हिडन फोल्डरमध्ये मुलींचे शेकडो नग्न फोटो आढळले, असा आरोप चाकणकर यांनी केला.

**२)** संबंधित मोबाईलमध्ये अनेक चॅटचे स्क्रिनशॉट सापडले. तसेच पार्टीचे फोटो, महिलांचे नग्न, अर्धनग्न तसेच अशोभणीय कृत्याचे व्हिडीओ सापडले, असा दावा चाकणकर यांनी केला.

**३)** प्रांजल खेवलकर यांच्या घरी सापडलेल्या मोबाईलमधून ७ मुलींसोबतचं चॅटिंग सापडलं आहे. या मुलींची नावे आरोष नावाने सेव्ह केलेली होती. याचाच अर्थ आरोष नावाची व्यक्ती या मुलींची तस्करी करत होता, असा आरोप चाकणकर यांनी केला आहे.

**४)** आरोपी प्रांजल खेवलकर यांनी पुण्यातील खराडी, गोवा, लोणावळा, साकीनाका आणि जळगाव येथे मुलींना पार्टीसाठी बोलावलं. त्यांना ड्रग्ज दिलं. त्यानंतर त्यांना नग्न करुन त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केला. यानंतर त्यांचे आक्षेपार्ह व्हिडीओ आणि फोटो बनवले. नंतर त्यांना ते फोटो आणि व्हिडीओ दाखवून ब्लॅकमेल केलं गेलं, असा आरोप राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांनी केला आहे.

**५)** मुलींना चित्रपटात काम देतो असं सांगत जाळ्यात अडकवलं आणि त्यानंतर त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केला, असा आरोप करण्यात आला आहे.



**६)** खेवलकरांच्या मोबाईलच्या हिडन फोल्डरम ध्ये २५२ व्हिडीओ, १४९७ फोटो, असे एकूण १७७९ फोटो-व्हिडीओ आहेत. हे सर्व फोटो अतिशय अश्लील, मुलींचे नग्न फोटो आणि व्हिडीओ आहेत, असा आरोप करण्यात आला आहे.

**७)** प्रांजल खेवलकर यांच्या मोबाईलमध्ये घरात साफसफाई करणाऱ्या मोलकरणीचे देखील अतिशय वाईट अवस्थेतील फोटो सापडले आहेत, असा देखील आरोप रुपाली चाकणकर यांनी केला आहे.

**८)** या प्रकरणात मुलींची मोठ्या प्रमाणात तस्करी झाल्याची शक्यता असून हे एक मोठं रॅकेट असण्याची शक्यता असल्याचा दावा रुपाली चाकणकर यांनी केला आहे.

**९)** खेवलकरांसोबत पार्टीत सापडलेल्या मुली या दोन वर्षांपासून संपर्कात होत्या, असाही दावा त्यांनी केलाय. तसेच पार्टीत अंमली पदार्थ सापडल्याचादेखील दावा त्यांनी केला.

**१०)** अनेक मुलींची फसवणूक केली. त्यामुळे मुलींनी चॅटमध्ये पैसे मागतल्याचंदेखील आढळ्याचा दावा चाकणकर यांनी केला आहे.

### रुपाली चाकणकर यांनी केल्या 'या' ६ मोठ्या मागण्या...

**१)** महिलांची मानवी तस्करी मोठ्या प्रमाणात झाली आहे. त्यामुळे विशेष तपास पथक म्हणजेच एसआयटीची स्थापन होऊन चौकशीची आवश्यकता आहे. आरोपीकडून २८ वेळा रुम बुक करुन मुलींना बोलावण्यात आलं होतं. या मागचा हेतू हा केवळ संघटीत नेटवर्कचा तपास व्हावा.

**२)** मानवी तस्करी प्रतिबंधक पथकाकडून म हिलांना कशाप्रकारे आणलं गेलं, त्यांची फसवणूक कशी केली गेली, त्यांच्यावर दबाव कशाप्रकारे टाकला गेला आणि यामध्ये इतर कोणतंही माध्यम इतर कोणतंही माध्यम त्यामध्ये महिलांचं नाव, मूळ गाव, वय, वैद्यकीय अहवाल, ओळख दस्ताऐवजांची खातरजमा व्हावी.

**३)** आरोपीचे मोबाईल, ईमेल, आर्थिक व्यवहार, कॉल डिटेल्स याची सखोल तपासणी होणं गरजेचं आहे.


**४)** हॉटेल व्यवस्थापनाची सखोल चौकशी व्हावी. या एसआयटीत महिला अधिकाऱ्यांचा समावेश करुन चौकशी प्रक्रियेत गोपनीयता सुनिश्चित करण्यात यावी. या चौकशीनुसार दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, जेणेकरुन अशा प्रकारच्या घटना प्रतिबंधित होतील.

**५)** हे प्रकरण केवळ एका पक्षापर्यंत मर्यादीत नसून मानवी तस्करी ही संघटित गुन्हेगारी आहे ती महाराष्ट्रात अतिशय भयावर गंभीर परिस्थिती निर्माण करत आहे.

**६)** ही घटना महिलांचे अनैतिक शोषणाचे गंभीर वास्तव्य दर्शवते. महिलांना सन्मान, सुरक्षितता आणि हक्काचे रक्षण करणं हे सामाजिकदृष्ट्या तसेच कायद्यानेही आवश्यक असल्याने या पार्श्वभूमीवर एसआयटीच्या माध्यमातून सखोल आणि वेळेत तपास व्हावा, अशी मागणी राज्य महिला आयोगाने पोलीस महासंचालकांकडे पत्रामार्फत केली आहे.

## वीज पडून युवकाचा दुर्दैवी मृत्यू, बैलही ठार

### राजुरा तालुक्यातील दु:खद घटना!



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, राजुरा (चंद्रपूर) :** राजुरा तालुक्यात आज दुपारी विजेच्या गडगडाटासह झालेल्या जोरदार पावसाने दोन दुर्दैवी घटना घडल्या. मौजा देवाडा येथील विजय जंगू मंडळी (वय २१ वर्षे) या युवकाचा वीज पडून मृत्यू झाला. दुसरीकडे पाचगाव येथील शेतात कामावर असलेल्या बैलावर वीज पडून एक बैल ठार झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाचगाव येथील विजय मंडळी हा युवक मौजा खिर्डी येथे दुपारी सुमारे ३ वाजता शेतात काम करत असताना अंगावर वीज पडली. या आघातात त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने गावात शोककळा पसरली आहे. विजय मंडळी यांच्या कुटुंबात केवळ आई आणि तो असा दोघांचाच आधार होता. त्यामुळे कुटुंबावर मोठा आघात झाला आहे.


तसेच, दुसरी घटना राजुरा तालुक्यातील मौजा अहेरी येथे साधारण १.३० वाजताच्या घडली. मधुकर तुकाराम सोयाम (वय ५२ वर्षे) हे चंद्रभान पांडुरंग चौधरी यांच्या शेतात कापूस डवळणीच्या कामासाठी गेले होते. तेव्हा अचानक वादळी वाऱ्यासह वीज कोसळून शेतातील एक बैल जागीच ठार झाला. मात्र, सुदैवाने मधुकर सोयाम यांना केवळ किरकोळ दुखापत झाली असून त्यांना अहेरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार देण्यात आले. या दोन्ही घटनांचे पंचनामे करण्याचे निर्देश तहसीलदार ओमप्रकाश गोंड यांनी दिले आहेत.

दरम्यान, आज दुपारी झालेल्या मुसळधार पावसामुळे राजुरा शहरातील काही सखल भाग जलमय झाले. विशेषतः बामणवाडा येथील स्नेहदीप कॉलनीमध्ये जोरदार पावसामुळे रस्ते जलमय झाले रस्त्यावर आणि घरात पाणी शिरल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाने उसंत दिली होती. त्यामुळे शेतकरी चिंतेत होता. मात्र आज अचानक दुपारच्या सुमारास वादळ वाऱ्यासह झालेल्या पावसाने काहीसा दिलासा मिळाला.

विजय मंडळी यांच्या दुर्दैवी निधनाबद्दल आमदार देवराव भोंगळे यांनी दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी सांगितले की, विजय मंडळी यांच्या निधनाची बातमी ऐकून मन सुन्न झाले. त्यांच्या कुटुंबाच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. या कठीण प्रसंगी त्यांना शासनाकडून सर्वतोपरी मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहे.

## किनवट तालुक्यात शिक्षणाचा धंदा?

### पालकांची तक्रार, विद्यार्थ्यांना मानसिक त्रास



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.०७, किनवट (नांदेड) :** एकीकडे शिक्षण हे मूलभूत हक्क असल्याचे सरकारचे धोरण असताना, दुसरीकडे किनवट तालुक्यातील काही शाळांमध्ये शिक्षणाचाच सर्रास व्यापार सुरू असल्याची गंभीर तक्रार पालकांनी केली आहे.सेमी इंग्लिश माध्यमात प्रवेश घेण्यासाठी शाळा प्रशासन पाच ते सहा हजार रुपयांची रक्कम पालकांकडून आकारत आहे. याशिवाय, सराव पेपरच्या नावाखाली दर विद्यार्थ्यांकडून दोनशे ते तीनशे रुपये वसूल करण्यात येत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.या सर्व माध्यमातून लाखो रुपयांची बेकायदेशीर वसुली होत असल्याचा आरोप पालकांनी करत, संबंधित शाळांवर चौकशीची मागणी केली आहे. शाळेची फी किंवा सराव पेपरची रक्कम वेळेवर न भरल्यास विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक त्रास दिला जात असल्याचीही गंभीर माहिती समोर आली आहे.

या प्रकारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं असून, शिक्षणापासून त्यांचं लक्ष विचलित होत आहे. शिक्षण संस्थांमधूनच मुलांवर अन्याय होतोय, हे दुर्दैवी आहे.या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाचे अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी तात्काळ लक्ष देऊन संबंधित शाळांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी पालकांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.

## मुदखेड ग्रामीण रुग्णालयात प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांची रुग्णांना अरेरावीची भाषा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.७, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी कर्तव्यावर असलेले प्रशिक्षणार्थी वैद्यकीय कर्मचारी अरे रवीची भाषा वापरत असून रुग्णांना दुय्यम वागणूक मिळत असल्याने रुग्णालयातील प्रशिक्षणार्थींनावर वरिष्ठांचे लक्ष नसल्यामुळे रुग्णांना सेवा व्यवस्थित देत नाहीत. तालुक्यांतील गोरगरीब रुग्णांना २४ तास तातडीची उपचार सेवा मिळावी या उद्देशाने शासनाने ग्रामीण रुग्णालय उभारले आहे. परंतु या ठिकाणचे अधिकारी व कर्मचारी जिल्ह्यांच्या ठिकाणी वास्तव्यास असल्याने उंटावर बसून शेळ्या हाकण्यासारखा रुग्णालयाचा कारभार आहे. ग्रामीण रुग्णालय कर्मचाऱ्यावर शासन लाखो रुपये खर्च करत आहे. अधिकारी व कर्मचारी मर्जीनुसार वैद्यकीय सेवेचा कारभार चालवत असल्याने रुग्णांना वैद्यकीय सेवा तातडीची तर सोडाचबाहेर रुग्णसेवा मिळतनाही




ग्रामीण रुग्णालयात सध्या कार्यरत असलेले कर्मचारी वैद्यकीय कॉलेजमधील शिकाऊ विद्यार्थी असल्याने अधिकारी व कर्मचारी तज्ञ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याविना रुग्ण तपासणी सेवेचा भरणा मोठ्या प्रमाणात आहे. गोरगरीब रुग्णांसोबत उद्धट वागणूक अरेरावी ची भाषा वापरत रुग्णांना वेठीस धरले जात आहे . रुग्णांवर उपचार करण्यासाठी स्वतंत्र कक्ष असताना दवाखान्याच्या बाहेरच्या खुल्या जागेत रुग्णांना इंजेक्शन दिले जात असल्याने ग्रामीण रुग्णालयाचा केविलवाणा प्रकार पाहून रुग्ण हातबल होत आहे. जिल्हा स्तरीय वरिष्ठ विभागाने याची दखल घेऊन संबंधिताची चौकशी करून कठोर कार्यवाही करण्याची मागणी केली जात आहे.

अधिकारी व कर्मचारी रेल्वेच्या वेळेनुसार ग्राम ीण रुग्णालय चालवत असल्याने रेल्वेची वाट रुग्णांना पहावी लागत आहे. यामुळे ग्रामीण रुग्णालयाचा कारभार रामभरोसावर चालत आहे. ग्रामीण रुग्णालयात कायमस्वरूपी कर्तव्यावर असलेले अधिकारी व कर्मचारी रुग्णांच्या वैद्यकीय तपासण्याची जबाबदारी प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांवर सोपवून मोकाट फिरत आहेत. यामुळे रुग्णालयांत तपासणीसाठी आलेल्या रुग्णांना अरेरावी ची भाषा वापरत आहेत. यांमुळे रुग्णांना दर्जेदार रुग्णसेवा मिळत नसून दुय्यम वागणूक मिळत आहे. एकीकडे केंद्र व राज्य शासन गोरगरीब रुग्णांसाठी म ोठ मोठ्या योजना राबवून गाजावाजा करत आहे. परंतु यास मुदखेडचे ग्रामीण रुग्णालय अपवाद असल्याचे दिसून येत आहे. सध्या ग्रामीण रुग्णालयाचा कारभार प्रशिक्षणार्थी कर्मचारी पाहत असल्याने रुग्णालय सलाईनवर असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

## किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघातील जनतेचा संतप्त सवाल

**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.७, किनवट (नांदेड) :** किनवट-म ाहूर विधानसभा मतदारसंघातील जनतेत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मतदारसंघातील शेतकरी, कष्टकरी, मजूर, बेरोजगार तरुणला रोजगार नसल्याने व वाडीवस्तीतील रहिवासी आणि सामान्य जनतेचा आवाज विधानसभेत उमटत नाही, ही खंत मोठ्या प्रमाणावर व्यक्त केली जात आहे. हा मतदारसंघ डोंगराळ व आदिवासी बहुल भाग असून, आजही अनेक वाड्या-वस्त्यांवर मुलभूत सुविधांचा अभाव आहे.

अनेक ठिकाणी आजही पिण्याच्या पाण्याची, रस्त्यांची, शाळांची आणि आरोग्य सेवांची वानवा आहे. शिक्षणासाठी झगडणाऱ्या ओबीसी विद्यार्थ्यांना वसतीगृहाची सुविधा मिळत नाही, यामुळे त्यांचे शिक्षण अर्धवट राहते. विधानसभेत आमदार खरोखर आपल्या मतदारसंघाचा आवाज उठवत आहेत का? की ते झोपा काढतात, की का असा सवाल जनतेतून उपस्थित होत आहे. हे चर्चेचे विषय सध्या किनवट व माहूर तालुक्याच्या चौकात, गल्लीबोळांत, चहा टपऱ्यांवरून आणि खेड्यापाड्यातून जोरात सुरू आहेत. गेल्या काही वर्षांपासून अनेक समस्या जसाच्या तशा आहेत, त्यामुळे जनतेचा संयम सुटत चालला आहे. लोकशाहीत निवडून दिलेले लोकप्रतिनिधी जर जनतेच्या प्रश्नांवर विधानसभेत आवाज उठवणार नसतील, तर त्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होतो, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी दिली.




## विनोद सम्राट !

आज ८ ऑगस्ट, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांची जयंती. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले. १९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली. सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली. १४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# रक्षाबंधन आणि स्त्री सुरक्षा !



रक्षाबंधन सण अगदी तोंडावर आल्याने बाजारपेठा विविध रंगांच्या राख्यांनी सजल्या आहेत. हिंदू संस्कृतीत भाऊ-बहिणीचे नाते हे अत्यंत पवित्र मानले जाते. रक्षाबंधनाच्या दिवशी बहीण भावाच्या मनगटाला राखी बांधून त्याच्याकडून तिच्या रक्षणाचे वचन घेते. भाऊसुद्धा 'प्राणपणाने तुझे रक्षण करेल', असे बहिणीला वचन देतो. या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उत्तम आरोग्यासाठी आणि समृद्धीसाठी देवाकडे प्रार्थना करते तर भाऊसुद्धा बहिणीच्या दीर्घायुष्यासाठी, सुखसंपन्नेतेसाठी आणि संरक्षणासाठी देवाकडे याचना करतो. सहस्रो वर्षांची परंपरा लाभलेल्या या सणाला भाऊ बहिणीतील अतुल प्रेमाची, आदराची आणि निष्ठेची जोड आहे. द्वापारयुगात एकदा भगवान श्रीकृष्णाच्या मनगटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहू लागले, हे पाहताच द्रौपदीने क्षणाचाही विलंब न करता नेसलेल्या भरजरी वस्त्राच्या टोकाचा एक तुकडा फाडून श्रीकृष्णाच्या मनगटाला बांधला. तेव्हापासून बहीण भावाच्या पवित्र नात्याचा हा उत्सव साजरा केला जाऊ लागला. रक्षाबंधनाच्या दिवशी सूर्योदयी स्नान करतात. उपकर्म करून ऋषींचे तर्पण करतात अपराह्नकाळीं राखी तयार करतात. तांदूळ, सोने आणि पांढऱ्या मोहऱ्या एकत्र करून त्यांची पुरचुंडी तयार केली जाते, जिला राखी म्हटले जाते. या राखीचे पूजन केले जाते. त्यानंतर 'येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबल: । तेन त्वामपि बध्नामि रक्षे मा चल मा चल ।।' हा मंत्र म्हणून बहीण भावाला ही राखी बांधते. 'महाबली दानवेद्र बळी राजा जिने बद्ध झाला, त्या रक्षेने मी तुलाही बांधतो. हे रक्षे, तू चलित होऊ नकोस' असा या मंत्राचा अर्थ आहे. कालागणिक हा सण साजरा करण्याची पद्धत जरी बदलली असली, तरी सणामागील उद्देश मात्र तोच आहे. आज आपला भाऊ साता समुद्रापार जरी असला तरी बहीण त्याला राखी पाठवायला विसरत नाही. ज्या बहिणींना सख्खा भाऊ नसतो ती अन्य पुरुषाला किंवा चंद्राला आपला भाऊ मानते आणि हा सण साजरा करते. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:। यात्रेतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफला: क्रिया:।' अर्थात ज्या कुळामध्ये स्त्रीची पूजा, म्हणजेच तिचा मान- सन्मान होतो, त्या कुळात सुशील आणि गुणसंपन्न संतती जन्माला येते. ज्या ठिकाणी स्त्रीचा अपमान होतो त्या कुळाची प्रगती खुंटते हा संस्कार हिंदू धर्मग्रंथांनी केल्यामुळे हिंदू धर्मात स्त्रीला नेहमीच आदराचे आणि सन्मानाचे स्थान दिले गेले आहे. रक्षाबंधन हा सणसुद्धा स्त्रीच्याप्रती आदर व्यक्त करणाराच आहे. आठशे वर्षांपूर्वी संत ज्ञानेश्वरांनी पसायदानातून विश्वबंधुत्वाची शिकवण दिली आहे. लहानपणी शाळेतसुद्धा सारे भारतीय माझे बांधव आहेत, अशी प्रतिज्ञा करूनच प्रत्येक जण मोठा झाला आहे. दुर्दैवाने या सर्वांचा आजच्या तरुण वर्गाला विसर पडला आहे. आजमितीला देशासह राज्यातील स्त्रियांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. दोन वर्षाच्या बालिकेपासून ८० वर्षाची वृद्धाही नराधमांच्या वासनेतून सुटत नाही. आपल्या बहिणीला रक्षणाचे वचन देणारा भाऊ अन्य स्त्रीमध्ये आपल्या भगिनींचे रूप का पाहू शकत नाही. आपल्या संस्कृतीचा आपल्यालाच विसर पडू लागला आहे का ?

छत्रपती शिवाजी महाराज हे आजच्या पिढीचे दैवत आहेत, आजचा तरुण एकवेळ आईवडिलांचा अपमान सहन करेल; मात्र छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अपशब्द काढणाऱ्याची जीभ छाटल्याशिवाय राहणार नाही. आज मंदिरातील देवांच्या मूर्ती शाबूत आहेत ते छत्रपती शिवाजी महाराजांमुळेच. पाच बलाढ्य पातशाह्यांविरोधात लढून महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. रयतेला भयमुक्त केले. व्यापाराचे निमित्त करून सत्ताकारणात ढवळाढवळ करू पाहणाऱ्या इंग्रजांना त्यांची जागा दाखवून दिली. आपल्या अधिकाराचा गैरवापर करून महिलेवर अत्याचार करणाऱ्या रांझे पाटलाचा चौरंगा करून छत्रपती शिवाजी महाराजांनी एक आदर्श स्वराज्यासमोर निर्माण केला. स्वराज्यातील स्त्रीकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्याची काय स्थिती होऊ शकते याचे उदहारण त्यांनी जगासमोर उभे केले. त्यानंतर कोणाची हिम्मत झाली नाही स्वराज्यातील स्त्रियांकडे वासनेच्या नजरेने पाहण्याची. शिवाजी महाराजांना देव मानणारा आजचा तरुण लुटीच्या मुद्देमालासह आलेल्या कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला सन्मानाने स्वगृही पाठवणाऱ्या शिवाजी महाराजांची वृत्ती अंगी केव्हा बाणवणार आहे ? स्वराज्यातील बाया बापड्यांच्या रक्षणासाठी स्वतःचे प्राण धोक्यात घालणाऱ्या संभाजी महाराजांचा आदर्श आजचा तरुण कधी अंगिकारणार आहे ? जो देश आपल्या इतिहासातून धडे घेत नाही तो देश रसातळाला जातो अशी एक म्हण आहे. आजच्या तरुणांची स्थितीही काहीशी अशीच झाली आहे. आज तरुणांना गरज आहे इतिहासातील थोर पुरुषांच्या चरित्रातून धडे घेऊन आपले चारित्र्य घडवायची. आजचे सरकार राज्यातील भगिनींना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने अंतर्गत दरमहा १५०० रुपये देत आहे ; मात्र बहिणींना केवळ आर्थिक साहाय्य करणे एव्हढेच भावाचे कर्तव्य नसून बहिणीच्या रक्षणाची सर्वस्वी जबादारी घेणे हे भावाचे प्रमुख दायित्व आहे. राज्याची परिस्थिती पाहता राज्यातील भगिनींना आर्थिक मदतीपेक्षा सुरक्षिततेचीच अधिक आवश्यकता आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील महिलेवर अत्याचार करणाऱ्या रांझे पाटलाचे हात पाय कलम करून वासनांधांवर अंकुश निर्माण केला होता. महाराष्ट्रातही अशा कठोर कायद्याची आज नितांत गरज आहे. स्त्री अत्याचाराच्या विरोधात ज्यावेळी कठोर कायदे अमलात येऊन त्यांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी केली जाईल, ज्या दिवशी स्त्री अत्याचाराचा आलेख घसरू लागेल आणि ज्या दिवशी एका स्त्रीच्या रक्षणासाठी हजारो मनगटे पुढे सरसावतील त्या दिवशी रक्षाबंधनाचा उद्देश खऱ्या अर्थाने साध्य झाला असे म्हणता येईल.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# प्रशासनावर लक्ष ठेवणारे पहारेकरी कुठे गेले ?

वसई- विरार महानगरपालिकेचे माजी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्यावर १२ ठिकाणी सक्तवसुली संचालनालय विभागाने २९ जुलै २०२५ रोजी केलेल्या कारवाईत १ कोटी ३३ लाख रुपये व कागदपत्रे जप्त केली. त्यांच्या बदलीनंतर महापालिकेच्या फाईल्स त्यांच्या बंगल्यात स्वाक्षरी करिता जात. बांधकाम परवानगी त्यांच्या सहीचा दर ३५ रुपये प्रती चौरस फूट. प्रशासकीय कामकाजावर लक्ष ठेवणारे पहारेकर्यांची भूमिका बजावणारे लोकप्रतिनिधी राजकारणात गुंतले असल्याने प्रशासनावर वचक राहीला नाही. काही महानगरपालिकांमध्ये प्रशासकीय राजवट सुरू आहे. आयुक्तांकडून सौदे होतात हे जेव्हा शिपायापासून वरच्या अधिकाऱ्यांपर्यंत समजते तेव्हा अशा कार्यालयात सामान्य जनतेची लयलूट होते. यालाच भ्रष्टाचार असे संबोधतात. मोदी सत्तेवर येण्या अगोदर प्रचार सभांमधून सांगत 'ना खाऊंगा ना खाने दुंगा' पुढे नागरिकांची लूटमार वाढली. अनिलकुमार पवार सारखे महापराक्रमी अधिकारी सर्वच शासकीय/ निमशासकीय कार्यालयात अस्तित्वात आहेत. सक्तवसुली संचालनालय विभागाने थोडा वेळ राजकारणी नेत्यांना बाजूला ठेवून आपला मोर्चा यांच्या दिशेस वळवला तर महाराष्ट्रवरचे कर्ज बर्यापैकी फेडता येईल. ग्रामपंचायत पासून तालुका, जिल्हा, राज्य पातळीवरील सर्व स्तरावर काही दिल्याशिवाय काही मिळत नाही हे सर्वश्रुत आहे. महाराष्ट्र पोलीसांच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाई होते ती कोणी तक्रार केली तर. महाराष्ट्र पोलीस विभागाचा दबदबा होता.मुंबई- महाराष्ट्रातील पोलिसांचे नावलौकिक आहे. असे असताना काही दुर्दैवी घटना घडल्यास पोलीस तपास यंत्रणांना डावलून सी बी आय, एस आय टी, ईडी यांच्याकडे चौकशीची मागणी केली जाते. यांच्यावर विश्वास ठेवून आपल्या पोलिसांना दुर्लक्षित केले जाते. सरकारकडून खरेच भ्रष्टाचाराविरुद्ध ठोस कारवाई होणार की नाही. अनिलकुमार पवारांचे धागेदोरे नासिक पर्यंत गेले आहेत. मोठे उच्च पदस्थ अधिकारीच लूटमार करणारे निघाले तर सामान्य नागरिकांनी न्याय कोणाकडे मागायचा असा प्रश्न निर्माण झाला आहे. गाडी, बंगला, मौल्यवान जडजवाहीर, सोनेनाणे मुबलक मिळवण्यासाठी सरकारी पदाचा गैरवापर सर्रास होतो आहे. अनिलकुमार पवार हे एक उदाहरण आहे. चला ! भ्रष्टाचारी शोधुन या ! अशी घोषणा कोणी नेत्यांनी केली तर तो निवडणुकीत निवडून येईल एवढा पाठिंबा मिळेल यात शंकाच नाही.

**महादेव गोळवसकर**
**कुर्ला मुंबई**
**९८६९४७६२०९**

## सण 'रक्षाबंधनाचा'

सण उत्साह-आनंदाचा,
नारळीपौर्णिमा - रक्षाबंधनाचा,
बहिण-भावाच्या पवित्र नात्याचा
प्रेमाच्या देवाण-घेवाणीचा

हतावर साज चढला,
रंगी-बेरंगी राख्यांचा....
राखी - नारळ - मिठाई,
दिव्याने रंग वाढला तबकाचा

टिळा लावूनी ओवाळीते
मान आज हा भावाचा,
राखी बांधुनी पेढा भरविते
घास असे हा प्रेमाचा....

लाभो तुला दीर्घायुष्य
मिळो आशीर्वाद ईश्वराचा
राहो संकटे तुझ्यापासून दूर
एकची ध्यास तुझ्या बहिणीचा

नको काही भेटवस्तू
नको दागिना सोन्या-चांदीचा
आठवण तुला सदा राहावी
क्षण असो सुखाचा वा दुःखाचा

तुझ्यासारखा भाऊ लाभला
भाग माझ्या पूर्वपुण्याईचा
असेच राहावे नाते आपुले
करार हा जन्मोजन्मीचा

**- ज्योती रावराणे**
**कांजूरमार्ग, मुंबई**

# बॅक बेंचर...

The best brains of the nation may be found on the last benches of the classroom. अर्थात

सर्वाधिक बुद्धिमान मुले ही शेवटच्या बाकावर असतात. हे वाक्य डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे आहे. त्यांच्या या वाक्याकडे फक्त प्रेरणादायी वाक्य म्हणून न पाहता त्यामागील वास्तवता समजून घेणे आवश्यक आहे. याच संदर्भात मागच्या आठवड्यात केरळ राज्यातील कोल्लम जिल्ह्यातील वालकोम या गावातील एका शाळेच्या गोलाकार बेंच असलेल्या वर्गरचनेचा फोटो सोशल मीडियावरून सर्वत्र व्हायरल झाला. या शाळेतील गोलाकार बेंच रचनेमुळे आता कोणताही विद्यार्थी 'बॅक बेंचर' म्हणजेच शेवटच्या बाकावर बसणारा राहिलेला नाही.

आपल्याकडे बहुतांश शाळांमध्ये हुशार मुले सुरुवातीच्या दोन बेंचांवर बसतात, मध्यम प्रगती असणारी मुले मधल्या बेंचांवर बसतात आणि अभ्यासात मागे राहणारी मुले शेवटच्या बेंचावर बसतात. ही मुले अनेकदा 'ढ' म्हणून हिणवली जातात. शिक्षकांचे लक्ष प्रामुख्याने पुढच्या बाकांवर असते. इतर विद्यार्थीही या मागच्या बेंचावर बसणाऱ्या मुलांची टवाळी करतात. परिणामी या विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड निर्माण होतो, आत्मविश्वास कमी होतो. अनेकदा सतत अपमानित झाल्यामुळे ही मुले शाळा चुकवतात किंवा शिक्षण अर्धवट सोडतात.

मी स्वतः शालेय जीवनात नेहमी पुढच्या दोन बेंचांवर बसत असे. कारण माझा अभ्यास चांगला होता आणि परीक्षेतील कामगिरी नेहमी उत्कृष्ट असायची. मात्र, आज जेव्हा माझे शालेय मित्र भेटतात, तेव्हा लक्षात येते की माझ्या वर्गातील जे विद्यार्थी मागच्या बेंचावर बसत असत, ते आज प्रगतशील बागायतदार, गॅरेज चालक, राजकारणी व उद्योजक झालेले आहेत. त्यांचे आर्थिक उत्पन्न हे माझ्यापेक्षा दुप्पट ते तिप्पटीने जास्त आहे. काही जणांचा शेतमाल परदेशात पाठवला जातो. एका मित्राने उभे केलेल्या वेल्डिंग गॅरेजमध्ये वाहन दुरुस्तीसाठी एक महिन्याची ॲडव्हान्स बुकिंग असते.

या उदाहरणांवरून स्पष्ट होते की ज्यांना 'ढ' समजले गेले, तेच आज समाजासाठी अधिक उपयुक्त सिद्ध झाले आहेत. आमच्या गप्पांमध्ये आम्ही असा निष्कर्ष काढतो की, सामान्यतः पुढच्या बेंचावर बसणारे विद्यार्थी शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनिअर होतात. मधल्या बेंचांवरील मुले ५०-७० टक्के गुण मिळवून वकील, प्रगतशील शेतकरी, वर्ग एक आणि दोन चे अधिकारी होतात. तर शेवटच्या बेंचावर बसणारी मुले राजकारणी, अध्यात्मिक गुरू, खेळाडू किंवा तृतीय-चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी होतात. मात्र अनेकदा हेच लोक पुढे जाऊन पुढच्या बेंचावर बसलेल्या लोकांना नोकरी देतात.

या सगळ्यात विसंगती वाटली तरी डॉ. अब्दुल कलाम यांच्या वाक्यानुसार यामध्ये वास्तवता आहे. केरळमधील शाळेने पारंपरिक वर्गरचनेला छेद देत गोलाकार बेंच रचना स्वीकारली आहे. यामुळे वर्गातील सर्व विद्यार्थ्यांकडे शिक्षक समान लक्ष देऊ शकतात. 'ढ' व 'हुशार' ही भेदभाव करणारी चुकीची कल्पना मोडून काढली जाईल. कारण कोणताच विद्यार्थी 'ढ' नसतो. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता वेगळी असते. केवळ भाषा, गणित, विज्ञान या विषयांमध्ये चांगले गुण मिळाले म्हणून काहींना हुशार ठरवणे म्हणजे इतर विद्यार्थ्यांवर अन्याय करणं होय.

खेळ, संगीत, अभिनय, नाट्य, व्यवहारज्ञान, जनसंपर्क अशा अनेक क्षेत्रांमध्ये प्राविण्य असणारी मुले अभ्यासात मागे राहू शकतात, पण त्यांची तीच खरी बुद्धिमत्ता असते.

शिक्षणतज्ज्ञ हॉवर्ड गार्डनर यांनी त्यांच्या 'Frames of Mind' या पुस्तकात म्हटले आहे की, प्रत्येक व्यक्तीकडे काही विशेष बुद्धिमत्ता असते. त्यांनी मांडलेल्या नऊ प्रकारच्या बुद्धिमत्ता खालीलप्रमाणे आहेत:

१)निसर्गवादी बुद्धिमत्ता – निसर्गातील घटकांचा अभ्यास करण्याची क्षमता (उदा. शेतकरी, पर्यावरणतज्ज्ञ)
२)संगीतात्मक बुद्धिमत्ता – संगीत समजून घेण्याची व सादर करण्याची क्षमता (उदा. गायक, वादक)
३)तार्किक-गणितीय बुद्धिमत्ता – समस्यांचे विश्लेषण करण्याची क्षमता (उदा. शास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ)
४) अस्तित्ववादी बुद्धिमत्ता – जीवनाच्या अर्थाचा शोध घेण्याची क्षमता (उदा. धर्मगुरू)
५)आंतरवैयक्तिक बुद्धिमत्ता – इतरांची मनोभूमिका समजण्याची क्षमता (उदा. नेते, शिक्षक)
६) शारीरिक-कौशल्यात्मक बुद्धिमत्ता – शरीराचा अचूक वापर करण्याची क्षमता (उदा. खेळाडू, नर्तक)
७)भाषिक बुद्धिमत्ता – भाषेचा प्रभावी वापर करण्याची क्षमता (उदा. लेखक, कवी)
८) अंतरावैयक्तिक बुद्धिमत्ता – स्वतःच्या भावना समजण्याची व त्या सांभाळण्याची क्षमता (उदा. योगगुरू)
९) अवकाशीय बुद्धिमत्ता – दृश्य गोष्टींची अचूक समज असणारे (उदा. वास्तुविशारद, चित्रकार)

याचा अर्थ प्रत्येक विद्यार्थ्याजवळ काही ना काही खास बुद्धिमत्ता असते. शिक्षकांनी ही बुद्धिमत्ता ओळखणे आणि त्या दिशेने प्रोत्साहन देणे महत्त्वाचे आहे. पालकांनीही आपल्या मुलांमधील नैसर्गिक गुण शोधून त्यांचा विकास करावा. शेवटी कोणताही विद्यार्थी 'ढ' नसतो, हे आता आपण सर्वांनी मान्य केले पाहिजे.

**- किशोर जाधव सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## अहिल्यानगर जिल्ह्यात १९२ गावात लंपीचा संसर्ग
### जिल्हा लम्पी बाधित क्षेत्र घोषित



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, अहिल्यनगर :** जिल्ह्यात जनावरांमध्ये लम्पी आजाराचा फैलाव मोठ्या प्रमाणावर आढळू लागला आहे. त्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने मोठा निर्णय जाहीर केला आहे. फैलाव वाढलेल्या गावांसह संपूर्ण जिल्हा लम्पी बाधित क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आला आहे. यामुळे जिल्ह्यातील सर्व गावे आता लम्पी नियंत्रित क्षेत्र ठरणार असून या ठिकाणी जनावरांची खरेदी विक्री, बाजार, शर्यती, वाहतूक यासह सार्वजनिक ठिकाणी जनावरे एकत्र आणण्यावर बंदी घालण्यात आली आहे. जिल्ह्यात सध्या १९२ गावामध्ये लम्पीचा फैलाव वाढला आहे. तालुकानिहाय गावांची संख्या पुढीलप्रमाणे आहे. अहिल्यानगर २, अकोले ४, जामखेड ४, कर्जत २३, कोपरगाव ११, नेवासा ३६, पारनेर १८, पाथर्डी २, राहाता २५, राही १३, संगमनेर ३१, शेवगाव २, श्रीगोंदा १४, श्रीरामपूर १९. या गावासह १० किलोमीटर परिसरातील गावे व वाड्यांचाही समावेश त्यात होत आहे.

त्यात वाहने व पशुधनासह वाहतूक करण्यास वाहनांवर प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच बाधित भागातील जनावरे यांचा निरोगी भागात प्रवेश प्रतिबंध करण्यात आला असून बाधित गावांमध्ये बाधित जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासह चाऱ्याची स्वतंत्र व्यवस्था करण्याचे सांगण्यात आले आहे. बाधित परिसरात स्वच्छता व निर्जंतूक फवारणी करणे, भटक्या पशुधनाचे नियमित निरिक्षण व बाधित पशुधनापसून काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## रेशनिंग दुकानांमध्ये भेसळयुक्त तांदूळ मिळत असल्याची तक्रार



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०७, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील काही रेशन दुकानांमध्ये भेसळयुक्त तांदूळ मिळत असल्याची तक्रार रेशन धारकांनी केली होती. या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेचे शहापूर तालुका अध्यक्ष प्रसाद भोईर, पत्रकार दिनेश गायकर व पत्रकार दिपक विशे यांनी तहसिलदार परमेश्वर कासुळे यांची भेट घेऊन याबाबत चर्चा केली असता,

तहसिलदारांनी सांगितले की, रेशन दुकांनामध्ये वितरित होणारा तांदूळ हा न्यूट्रीलाईज तांदूळ आहे. हा तांदळाच्या तुकड्यांपासून किंवा मका, गहू, कांदास्टार्च यांपासून बनवला जातो. यामध्ये लोह, फोलिक ॲसिड, व्हिटॅमिन बी१२, कधी कधी झिंक, व्हिटॅमिन अ, कॅल्शियम इत्यादीक पोषकतत्त्वे मिसळली जातात. या तांदळामध्ये काही दाणे पांढरेसर किंवा वेगळ्या रंगाचे दिसतात. त्यामुळे तो भेसळयुक्त वाटतो. मात्र हा तांदूळ पूर्णपणे सुरक्षित असून ह्या पोषक तांदळाच्या सेवनाने अनीमिया कमी होतो. न्यूट्रीलाईट तांदळाचा नियमित वापर रक्तातील हिमोग्लोबिन पातळी वाढविण्यासाठी मदत करतो. मानसिक विकासास मदत, तांदळामध्ये जीवनसत्त्वे आणि खनिजे असल्यानं शरीरास आणि मेंदूला आवश्यक पोषण मिळते. तसेच गर्भवती महिला व बालकांसाठी उपयुक्त, विशेषत गर्भवती महिला आणि लहान बालकांसाठी पोषण पुरवते, ज्यामुळे त्यांचा शारीरिक आणि मानसिक विकास चांगला होतो. भारत सरकारने २०२१ पासून हा तांदूळ कुपोषण कमी करण्यासाठी रेशनद्वारे देण्यास सुरुवात केली आहे. एफ.एस.एस.ए.आय च्या मानकांनुसार तो प्रमाणित असून नागरिकांनी काळजी न करता वापर करावा, असे आवाहन तहसिलदारांनी केले.

## विज कोसळून बैलजोडी ठार; खरीप हंगामात शेतकऱ्यावर संकट

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, बल्लारपूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तालुक्यातील हडस्ती शेतशिवारात आज गुरूवार, दिनांक ०७ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास मेघगर्जनेसह पाऊस झाला. विजेचा कडकडाटासह पावसात विज कोसळून हडस्ती येथील शेतकरी सुनील नामदेव खोके यांची बैलजोडी ठार झाल्याची घटना घडली. यामुळे ऐन खरीपाच्या हंगामात शेतकऱ्यावर संकट ओढावले आहे. बल्लारपूर तालुक्यातील शेतकरी सुनील खोके नेहमी प्रमाणे शेतशिवारात काम करत होते.

दरम्यान दुपारी २ वाजताच्या सुमारास आकाशात काळेकुट्ट ढग जमा झाले. काही कळायच्या अगोदर मेघ गर्जनेसह पाऊस सुरु झाला. नेमक्या त्याचवेळी शेत शिवारात असलेल्या बैलजोडीवर वीज कोसळली. या घटनेत दोन बैल जागीच ठार झाले. ऐन शेतीच्या हंगामात बैलजोडी ठार झाल्याने शेतकऱ्यावर मोठे आर्थिक संकट ओढावले आहे. शासनाने पिडीत शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

## जुनी शेल्टर हाउसिंग सोसा. बिल्डिंगचा काही भाग कोसळला



**अक्षराज : भाऊसाहेब पाटील**

**दि.०७, कुर्ला (मुं. उपनगर) :** गुरुवार, दिनांक ०७ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ४:४५ वाजता कुर्ला पश्चिम कुर्ला येथे जुनी शेल्टर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी बिल्डिंगचा काही भाग कोसळला. सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा कोणीही जखमी झाले नाही.

## पारनेर तालुक्यातील शेकडो कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश
### आमदार काशिनाथ दाते यांच्या विजयानंतर पारनेर राष्ट्रवादीला 'अच्छे दिन'




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील विविध राजकीय पक्षांतील शेकडो पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत जाहीर प्रवेश केला. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व यांच्या प्रमुख उपस्थितीत व आमदार काशिनाथ दाते यांचे नेतृत्वावर विश्वास दर्शवत मुंबईतील महिला विकास मंडळ सभागृहात हा भव्य पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

विशेष म्हणजे हे सर्व पक्ष प्रवेश आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रयत्नांमुळे शक्य झाले असून त्यांच्या संघटन क्षमतेचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे. त्यांच्या विधानसभेतील विजयानंतर पारनेर राष्ट्रवादीला अच्छे दिन आल्याचे पहावयास मिळत आहे. विविध गावच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील या प्रवेशाम ुळे तालुक्याच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक बळकट होणार असून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी हा पक्षप्रवेश निर्णायक ठरू शकतो.

यावेळी शिवसेना उपतालुका प्रमुख पंढरीनाथ उंडे, महाराष्ट्र राज्य वाहतूक सेना उपाध्यक्ष धनंजयशेठ निमसे, युवसेना तालुकाप्रमुख सुभाष सासवडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रकाश रोहकले, शिवसेना विभागप्रमुख देवराम मगर, माजी पंचायत समिती सदस्य प्रदीप वाळुंज, शिवसेना गणप्रमुख अक्षय गोरडे, शिवसेना शाखाप्रमुख करंजाळे संजय आहेर, शिवसेना माजी गटप्रमुख संतोष चौगुले, अविनाश गोडसे, माजी सरपंच पळसपुर महादेव पवार, शुभम गोडसे, विनोद गोडसे, प्रवीण डोंगरे, अनिल आहेर, प्रदीप वाफारे, नवनाथ आग्रे, प्रदीप चौधरी, अशोक वाळुंज, नवनाथ खरात, कान्हूर तर्फे पाडळी गावचे माजी सरपंच हरीश दावभट, युवासेना उपतालुकाप्रमुख ऋषिकेश नरसाळे, युवासेना उपतालुका प्रमुख शुभम टेकुडे, शिवसेना गणप्रमुख शरद गागरे, कामटवाडी गावचे सरपंच संतोष मोरे, पोखरी उपसरपंच परसराम शेलार, खादी ग्रामोद्योगचे अध्यक्ष आण्णासाहेब खैरे, तिखोल गावचे माजी सरपंच सुभाष ठाणगे, माजी सरपंच गीताराम वाळुंज, चेअरमन बाळासाहेब रोकडे, अमोल रोकडे, धनंजय ढोकळे, भाऊसाहेब गागरे, दत्तात्रय फटांगरे, मिनिनाथ शिर्के, श्रीकांत वाघमारे, रामदास ढोले, राजेंद्र मुगदे, बाळासाहेब कोकाटे, संदिप केदार, एकनाथ दुधवडे, बाबासाहेब रोकडे, साहेबराव काशिद, संजय थोरात, अशोक खैरे, बाळशिराम शिंदे, निलेश पवार, सोपान फरतारे, अविनाश शेलार, सुमित रोहकले, नंदकुमार भांड, विक्रम मंचरे, विकास शिवले आदिंनी राष्ट्रवादीत प्रवेश केला.

## वन्य प्राण्यांमुळे पिकांचे नुकसान; खा.सोनवणेंनी संसदेत मांडला प्रश्न
### हरीण, रानडुकरांनी नुकसान केल्यास भरपाई का नाही?; शेतकऱ्यांच्या आवाज दिल्लीत पोहचविला



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.०७, बीड :** बीड जिल्ह्यात हरीण, रानडुक्करे व इतर वन्य प्राण्यांम ुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान होत आहे. नैसर्गिक आपत्ती सोबतच जंगली प्राणी उपद्रवामुळे शेतीमालाचे नुकसान बीड जिल्ह्यातील कांही भागात मोठ्या प्रमाणात होत असते. ही चिंतेची बाब आहे. हा उपद्रव रोकण्यासाठी उपाय योजना करण्याची गरज आहे. नुकसानग्रस्त शेतक-यांना पिकांची नुकसान भरपाई मिळत नाही. इतर राज्यांमधे हत्तीने पिकाचे नुकसान केले तर भरपाई मिळते, पण आमच्या शेतकऱ्यांना हरीण, रानडुक्कर यांनी नुकसान केल्यानंतर नुकसान भरपाई का मिळत नाही?, असा सवाल उपस्थित करत वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या पिकांच्या नुकसानीची भरपाई मिळावी तसेच हा उपद्रव रोकण्यासाठी शाश्वत उपाययोजना कराव्यात,अशी म ागणी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत केली. जिल्ह्यातील शेतकरीपुत्र म्हणून खा.सोनवणे यांची ओळख असून ते वारंवार शेती प्रश्नावर आवाज उठवित आहेत. कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकुर यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले आहे. पंतप्रधान पीक विमा योजनेत नैसर्गिक आपत्तीम ुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीस संरक्षण मिळते तसेच शेतीला कुंपण घालण्यासाठी राज्य सरकारे उपाययोजना करतात मात्र, जंगली प्राण्यांमुळे होणारे नुकसान हे टाळता येण्यासारखे असल्याने आधी या योजनेत त्याचा समावेश नव्हता. पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच विविध राज्य सरकारांच्या विनंतीनंतर, राज्य सरकारांना या नुकसानीचा 'ॲड-ऑन कव्हर' स्वरूपात समावेश करण्याची परवानगी देण्यात आली आहे. तथापि, महाराष्ट्र सरकारने आतापर्यंत हा पर्याय लागू केलेला नाही. तसेच, केंद्र सरकारकडून 'डेव्हलपमेंट ऑफ वाइल्डलाईफ हॅबिटॅट्स', 'प्रोजेक्ट टायगर' आणि 'प्रोजेक्ट एलिफंट' या योजनांतर्गत राज्यांना आर्थिक मदत दिली जाते. याम ध्ये काटेरी तारांचे कुंपण, सोलार ऊर्जे वर चालणारे कुंपण, कॅक्टसची जिवंत फ ेन्सिंग, भिंती इत्यादींची उभारणी करून पिकांमध्ये जंगली प्राण्यांची घुसखोरी रोखण्याच्या उपायांचा समावेश आहे. बीड जिल्ह्यात हरीण, रानडुकरांमुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना वन्यप्राण्याने केलेल्या नुकसानीची भरपाई मिळावी, शिवाय पिक वाचविण्यासाठी व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी खा.सोनवणे यांनी केली आहे.

**अशा आहेत महत्वाच्या मागण्या -**

१. महाराष्ट्रात पंतप्रधान पीक विमा योजनेच्या ॲड-ऑन कव्हरमध्ये हरिण व रानडुकरांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीचा समावेश करण्यास तात्काळ मान्यता द्यावी.

२. हा पर्याय लागू झाल्यानंतर शेतकऱ्यांना त्याबाबत योग्य ती माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून ते वेळेत या योजनेचा लाभ घेऊ शकतील.

३. तसेच, केंद्र व राज्य योजनांद्वारे उपलब्ध असलेल्या सोलार किंवा तारांचे कुंपण, भिंत बांधकाम इत्यादी प्रतिबंधात्मक उपायांना ही अधिक बळकटी द्यावी.

**मुख्यमंत्र्यांकडे ही केली मागणी -**

केंद्रशासनाच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना आवश्यक ती आर्थिक सुरक्षा मिळेल आणि शेतीसंबंधी टाळता येणाऱ्या धोका घटकांपासून संरक्षण मिळेल, मात्र महाराष्ट्र राज्यातील सर्वदूर भागामधे रानडुक्कर, हरिणे तसेच इतर जंगली प्राणी याचा शेतास होत असलेल्या उपद्रवामुळे शेतकरी त्रस्त आहेत. त्यामुळे प्रधानमंत्री पीक विमा योजनेमधे केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ॲड-ऑन कव्हरमधे रानडुक्करे, हरिणे व इतर जंगली प्राण्यांमुळे होत असलेल्या नुकसानीचा समावेश करावा व अशा भागामधे शेतीला कुंपण घालून हा उपद्रव रोकण्यासाठी उपाययोजना करव्यात यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना खा.बजरंग सोनवणे यांनी पत्र देऊन मागणी केली आहे.

## शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी शोध मोहिम तीव्र करा : नितीन मत्ते
### शालेय शिक्षण मंत्र्यांना दिले निवेदन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७ वरोरा(चंद्रपूर) :** केंद्र व राज्य शासनाच्या 'सर्व शिक्षा अभियान' अंतर्गत ७ वर्षावरील शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या शोध मोहिमेला चंद्रपूर जिल्ह्यात गती द्यावी, अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख नितीन मत्ते यांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. चंद्रपूर जिल्हा हा औद्योगिक प्रगतीसाठी ओळखला जातो. जिल्ह्यात चार वीज निर्मिती केंद्रे, मोठ्या प्रमाणावर कोळसा खाणी, सिमेंट व लोह प्रक्रिया उद्योग, फ्लोराईड खाणी असे विविध कारखाने कार्यरत आहेत. या ठिकाणी काम करणाऱ्या बहुतांश मजुरांमध्ये परप्रांतीय मजुरांची संख्या लक्षणीय आहे. त्यांच्या पाल्यांची शाळेत नियमित उपस्थिती नसल्यामुळे ही मुले शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या श्रेणीत येतात.

नितीन मत्ते यांनी निवेदनात नमूद केले आहे की, रस्त्यांवर भिक्षा मागणारी मुले, कचरा वेचक, घासलेट, धार लावणारे कुटुंबातील मुले, तसेच विविध सिग्नलवर दिसणारी भटक्या प्रवृत्तीची मुले अनेकदा शाळेत नावनोंदणी केलेली असली तरी उपस्थितीत मात्र ते शून्य असते. यामुळे ही मुले केवळ नावापुरती शाळेत दाखल असल्याचे दिसते. नितीन मत्ते यांनी शिक्षण विभागावर दुर्लक्षाचा आरोप करत म्हटले की, केंद्र व राज्य शासनाने शिक्षण हे प्रत्येक मुलाचा मूलभूत हक्क म्हणून मान्य केले आहे. त्यानुसार शाळाबाह्य मुलांना पुन्हा शाळेत आणण्यासाठी कायदा अस्तित्वात असतानाही, जिल्हा शिक्षण विभागाकडून अशा विद्यार्थ्यांची शोध मोहीम प्रभावीपणे राबवली जात नाही. या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या शिष्टमंडळाने शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी तालुकाप्रमुख श्रीकांत खंगार, भद्रावती तालुका संघटक सुरज शहा, सुमित हस्तक, भद्रावती उपशहर प्रमुख मनीष बुचे, अविनाश उके आदी शिवसैनिक उपस्थित होते.

## ठाण्यात रानभाज्या महोत्सव उत्साहात संपन्न



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.६, ठाणे :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (यूएमइडी) अंतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, ठाणे यांच्यातर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही 'रानभाज्या महोत्सव २०२५-२६' चे आयोजन करण्यात आले. हा महोत्सव आज, दि.६ ऑगस्ट, २०२५ रोजी बी.जे. हायस्कूल, टेंभी नाका, ठाणे येथे पार पडला. जिल्ह्यातील विविध डोंगरी, दुर्गम व जंगली भागांतून नैसर्गिक पद्धतीने पावसाळ्यात उगम पावणाऱ्या औषधी व गुणकारी रानभाज्यांचे या महोत्सवात प्रदर्शन व विक्री करण्यात आली. यासाठी जिल्ह्यातून एकूण ५० स्टॉल्सची मांडणी करण्यात आली होती, ज्यामध्ये १०० स्वयंसहायता गटातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या महोत्सवाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे मार्गदर्शन करताना म्हणाले की, रानभाज्या महोत्सव आपल्या ग्रामीण संस्कृतीचे, आरोग्यदायी जीवनशैलीचे आणि स्वयंसहायता गटातील महिलांच्या आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करत त्यांच्या आत्मविश्वासात मोठी भर पडते, हीच खरी यशाची पावती आहे.

आघाडा, शेवळा, कुरकुरी भाजी, भारंग, मायाळू, कवळाकवळी, फोडी, दिंडा भाजी, करटोली, टाकळा, शेवगा इत्यादी विविध प्रकारच्या औषधी व पारंपरिक रानभाज्यांनी महोत्सवाला आरोग्यदायी व सांस्कृतिक वैभव प्राप्त करून दिले. या रानभाज्यांचे केवळ पोषणमूल्यच नव्हे, तर आरोग्यवर्धक व रोगप्रतिकारक गुणधर्म असल्यामुळे नागरिकांनी महोत्सवाला मोठा प्रतिसाद दिला. यामुळे एकूण नफा ₹६३,१८०/- इतका झाला. हा नफा थेट महिलांच्या हाती गेला असून, त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी तो उपयुक्त ठरला आहे, अशी माहिती प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांनी दिली. कार्यक्रम प्रसंगी प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, जिल्हा कृषी अधिकारी एम.एम बाचोटिकर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) देविदास महाजन तसेच कृषी विभागाचे अधिकारी, जिल्हा आणि तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुन्हा दिवा शहर संघटक या पदावर ज्योती पाटील यांची निवड

## दिवा शहरातील महिला शिवसेना पदाधिकारी जाहीर



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, दिवा (ठाणे) :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार ठाणे जिल्ह्यातील दिवा शहरामधील महिला शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. दिवा शहर संघटक पदी ज्योती पाटील यांची पुन्हा निवड झाली आहे. पक्षाने पुन्हा त्यांच्यावर विश्वास दाखवला आहे. त्यांनी केलेल्या कामाची दखल पक्षाने घेतली आहे. विधानसभा संघटक- योगिता नाईक, समन्वयक प्रियांका सावंत, उपशहर संघटक प्रभाग २७ स्मिता जाधव, उपशहर संघटक प्रभाग २८ उज्वला पाटील, विभाग संघटक मयुरी पोरजी, सुहासिनी गुळेकर, आशा इंगोले, वृषाली साळुंखे, तनया बदरकर, प्रिया भोईर, रिना म्हात्रे, उपविभाग संघटक शुभांगी पाटील, शोभा तारळेकर, पुनम पाटणकर, नम्रता कदम, मीनाक्षी शिंदे, अनिता देसाई, गीता भोईर, स्मिता शिंदे, माधुरी जाधव, सोनम मुंडा, निशा राहदले, शाखा संघटक आशा कनोजिया, सोनाली वीर, संगीता उतेकर, जान्हवी जावडेकर, संगीता मचाडो, सुनिता त्रिपाठी, शुभदा राणे, गीता पाटील, कविता कुंभार, दीपाली रहाटवळ, अश्विनी आडेकर, सुजाता मोरे, आशा गायकवाड, पूजा गडकरी, रिया साळुंखे, प्रियांका जोशी, सुप्रिया यादव, सीता जैस्वाल, पूजा आग्रहारी, सुमिता शिंदे, मोनिका माने, नीलम नरसिंह, रंजना देसाई, प्रियांका यादव, श्रावणी कदम यांच्या नियुक्त्या करण्यात आल्याची माहिती शिवसेना मध्यवर्ती कार्यालयातून प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे कळवण्यात आली आहे.

# कळंब - लातूर रस्त्यावरील अपूर्ण कामांमुळे जीवितहानी

## शिवसेना आक्रमक, तीव्र आंदोलनाचा इशारा



**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.०७, धाराशिव :** कळंब - लातूर रस्त्यावरील अपूर्ण कामांमुळे अनेक निष्पाप नागरिकांचा जीव गमवावा लागला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा गट) आणि स्थानिक नागरिक आक्रमक झाले असून तीव्र आंदोलनाचा इशारा निवेदनाद्वारे प्रशासनाला देण्यात आला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याचे काम अपूर्ण असून खडकी गावाजवळील अरुंद पुलावर अपघात होऊन प्रकाश महाजन आणि मंगेश महाजन या दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. यानंतर आमदार कैलास घाडगे पाटील यांनी दिनांक १० मे २०२५ रोजी पोलीस अधिक्षकांना पत्र पाठवून संबंधित अभियंता व कंत्राटदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. त्याआधीही त्यांनी कार्यकारी अभियंता, लातूर आणि अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई यांना पत्राद्वारे सूचना दिल्या होत्या.

मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यानंतर कळंब शहरातील तरुण व्यापारी कै.रमेश होनराव यांचा करंजकल्ला गावाजवळील अरुंद वळणावर, चेतावणी फलक नसल्यामुळे दुर्दैवी अपघातात मृत्यू झाला. तसेच डिकसळ पाटी, त्रिवेदी कॉम्प्लेक्स, छत्रपती संभाजीराजे चौक या ठिकाणी नेहमीच मोठी वर्दळ असूनही गतिरोधक नसल्यामुळे अनेक छोटे-मोठे अपघात घडत आहेत.

या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा) स्टाईलने तीव्र स्वरूपाचे रस्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा तहसीलदार यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनावर तालुका प्रमुख सचिन काळे, माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा, प्रा.डॉ. संजय कांबळे, प्रदीप मेटे, शहर प्रमुख विश्वजीत जाधव, युवासेना तालुका प्रमुख पंडित देशमुख, उपशहर प्रमुख निर्भय घुले, शाम खबाले, संतोष लांडगे, प्रा.दिलीप पाटील, गोविंद जोगदंड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**तालुका व्यापारी महासंघाचा ही इशारा - रक्षाबंधनपूर्वी उपाययोजना करा**

तालुका व्यापारी महासंघ, कळंब यांनी देखील निवेदनाद्वारे प्रशासनास इशारा दिला आहे. रक्षाबंधन काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. अशा सणासुदीच्या काळात करंजकल्ला वळणावर आणखी एखाद्या बहिणीचा भाऊ अपघातात गमावू नये. यासाठी तातडीने खालील उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे: करंजकल्ला वळणावर स्पीड ब्रेकर, चेतावणी फलक आणि दिव्यांची त्वरित व्यवस्था करावी, वळणाची रचना बदलून सुरक्षित वळण तयार करावे, भविष्यातील अपघात टाळण्यासाठी स्थायी उपाययोजना कराव्यात, जर वरील मागण्या त्वरित पूर्ण करण्यात आल्या नाहीत, तर स्थानिक व्यापारी व नागरिकांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडण्यात येईल, असा थेट इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर तालुकाध्यक्ष नंदकिशोर मोरे, शहराध्यक्ष मयूर रुणवाल, तालुका सचिव बालाजी बावळे यांच्यासह अनेक व्यापाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कबुतरखाने बंदच राहणार...; मुंबई हायकोर्टाचा बंदी उठवण्यास नकार



**अक्षराज : संजय पंडीत**

**दि.०७, मुंबई :** मुंबई हायकोर्टाने कबुतरांना अन्न, पाणी देण्याची बंदी कायम ठेवली आहे. तसंच तज्ज्ञाची कमिटी तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान हायकोर्टाने पुढील सुनावणीला ॲटर्नी जनरलला उपस्थित राहण्यास सांगितलं आहे. मुंबई हायकोर्टाच्या आणि सरकारच्या निर्देशाचं पालन करत पालिकेकडून मुंबईतील सर्व कबुतरखाने बंद करण्यात आले होते. मात्र त्यावरुन काहींनी विरोध केला आणि दिनांक ०६ ऑगस्ट २०२५ रोजी तर जैन समाजाने रस्त्यावर आक्रमक आंदोलन करत दादरमध्ये लावण्यात ताडपत्री फाडून टाकली. दरम्यान मुंबई हायकोर्टाने कबुतरांना अन्न, पाणी देण्याची बंदी कायम ठेवली आहे. बुधवारी पुढील सुनावणी होणार आहे.कबुतरखाना बंद करण्याविरोधात बुधवारी जैन समाज रस्त्यावर उतरला आणि आक्रमकपणे आंदोलन करत ताडपत्री फाडून टाकली. तसंच पुन्हा एकदा कबुतरांना खाद्य टाकण्यास सुरुवात केली. यादरम्यान त्यांनी पोलिसांशी हुज्जत घालत त्यांचा विरोध डावलला होता. यानंतर मुंबईचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी जे झालं ते चुकीचं असून प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याची प्रतिक्रिया दिली होती. तसंच कोर्टात सुनावणी होणार असून, त्याआधी संयम पाळण्याचं आवाहन केलं होतं. त्यानुसार आज कोर्टात सुनावणी पार पडली. कबूतरखानावर ॲनिमल वेलफेअरने आपलं उत्तर दिलं. केंद्रीय पशुसंवर्धन विभागाने नियम कोर्टापुढे दिले आहेत. खाण्यापिण्यावर काय नियम आहेत यावर कागदपत्रे कोर्टासमोर ठेवण्यात आली. पुरातन वास्तू विभागाचे विठ्ठल जाधव यांनीही आपली कागद सादर केली. कोर्टाने यावेळी निरीक्षण नोंदवताना ही सार्वजनिक जागा असल्याचं सांगितलं. वैद्यकीय अहवालानुसार आम्ही कबुतरांचं खाणं बंद करण्याचे आदेश हे तज्ञ आणि डॉक्टरांच्या कागदपत्रांच्या आधारे घेतले होते. हे काय आमचे स्वतः चे मत नव्हते. सार्वजनिक आरोग्याच्या मुद्द्यावर राज्य सरकारचे दुमत असल्याचे कारण नाही असं कोर्टाने यावेळी स्पष्ट सांगितलं.

महापालिकेने यावेळी या विषयांमध्ये अनेक लोकांना फुफ्फुसा संदर्भात समस्या झाल्याचे सांगितले. हे सगळं वैद्यकीय पुराव्यानुसार झालं असल्याचंही त्यांनी सांगितलं.सार्वजनिक आरोग्य आणि देशातील प्रत्येकाच्या आरोग्याची काळजी घेणं हा आमचे उद्देश होता.

या पलीकडे जाऊन राज्य सरकारला काही वेगळे निर्णय घ्यायचे असेल तर तो त्यांनी घ्यावा असं कोर्टाने स्पष्ट सांगितलं. दरम्यान काल मुख्यमंत्र्यांनी यांनी कबुतरखाना संदर्भात दिलेल्या निर्णयानंतर कंट्रोल फिडींग पर्याय सुचवला होता. त्यानुसार कबुतरांना सकाळी १ तास ६ ते ७ खायला घालण्याची परवानगी द्या अशी विनंती करण्यात आली. दरम्यान न्यायमूर्तींनी न्यायालयाच्या आदेशाचं पालन केलं पाहिजे. या मुद्द्याला उगाच वेगळा रंग देण्याचा प्रयत्न करू नये आम्ही या समस्येचा निदान करण्याचे प्रयत्न करत आहोत असं सांगितलं. कोर्टाने एका तज्ज्ञाची कमिटी तयार करण्यास सांगितले. तसंच पुढील सुनावणीस ॲटर्नी जनरलना उपस्थित राहण्याचे आदेश देत बंदी कायम राहणार असल्याचं स्पष्ट केलं. आता पुढील सुनावणी १३ ऑगस्टला होणार आहे.

## अंबाजोगाई येथे पासपोर्ट सेवा केंद्र स्थापनेची खा.सोनवणेंची केंद्रीय दळणवळण मंत्र्यांकडे मागणी



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.०७, केज (बीड) :** जिल्ह्यासह अंबाजोगाई परिसरातील हजारो नागरिकांना पासपोर्ट सेवांसाठी नांदेड, लातूर किंवा पुणे या सारख्या दूरच्या शहरांमध्ये जावे लागते. ग्रामीण भागातील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सामान्य नागरिक यांना होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन अंबाजोगाई येथे पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र (पीओपीएसके) स्थापनेची मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे केली आहे. अंबाजोगाई ही शैक्षणिक, आरोग्य, प्रशासकीय दृष्टिकोनातून महत्वाची आणि बीड जिल्ह्यातील प्रमुख नगरी आहे. तर जिल्ह्यासह अंबाजोगाई परिसरातील हजारो नागरिकांना पासपोर्ट सेवांसाठी नांदेड, लातूर किंवा पुणे या सारख्या दूरच्या शहरांमध्ये जावे लागते. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सामान्य नागरिक यांना होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन अंबाजोगाई येथे पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र (पीओपीएसके) स्थापन करणे गरजेचे आहे. हे केंद्र स्थापन झाल्यास अंबाजोगाईसह केज, धारूर, परळी, माजलगाव या भागातील लोकांना देखील याचा लाभ होणार आहे. या मागणीचे निवेदन खासदार बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची दिल्ली येथे भेट घेऊन सादर केले. तर या आपल्या पाठपुराव्यातून लवकरच ही सुविधा अंबाजोगाईत सुरु होईल, अशी खात्री ही खासदार बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केली.

## राजेंद्र उच्च माध्यमिक विद्यालयात नवागतांचे स्वागत उत्साहात संपन्न

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०७, खंडाळा (सातारा) :** गुरुवार दिनांक ०७ ऑगस्ट २०२५ रोजी राजेंद्र उच्च माध्यमिक विद्यालय खंडाळा येथे इयत्ता अकरावी कला, वाणिज्य, विज्ञान व व्यवसाय विभागात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागताचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे खंडाळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुनील शेळके यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना विविध कायद्यासंदर्भात माहिती दिली व कायद्याचे पालन करून आपली प्रगती साधावी असे आवाहन या प्रसंगी त्यांनी उपस्थितांना केले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती असलेले खंडाळा नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. कल्याण हुलगे साहेब यांनी स्पर्धा परीक्षेमध्ये कसे यश प्राप्त करावे. या संदर्भात विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळा संस्थेचे सचिव अनिरुद्ध दादा गाढवे यांनी विद्यार्थ्यांना शिस्तीचे महत्व समजावून सांगितले व विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी विद्यालयात राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे माजी प्राचार्य शब्बीर नालबंद यांनी केले. या प्रसंगी त्यांनी विद्यालयाची माहिती सांगून प्रमुख पाहुण्यांचा परिचय व स्वागत केले. या कार्यक्रमामध्ये प्रातिनिधिक स्वरूपात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व पेन वाटप करून स्वागत केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्रवीण बोरगावे यांनी केले. आभार प्रदर्शन विद्यालयाचे प्राचार्य तुळशीराम खांडे यांनी केले. या कार्यक्रमास खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळा संस्थेचे उपाध्यक्ष सुरेश पवार, संचालक वसंत पंडित, विद्यालयाच्या उपप्राचार्या अरुंधती गाढवे, विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग उपस्थित होते.

# थोडक्यात

## पेमदरा येथे उभारण्यात येणाऱ्या कलाकेंद्रला स्थगिती निलेश लंके प्रतिष्ठानचा कलाकेंद्राला होता तीव्र विरोध



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर व पुणे जिल्ह्याच्या हद्दीवर असलेल्या पेमदरा येथे प्रस्तावित कला केंद्राच्या बांधकामास पारनेर तालुक्यातील ग्रामस्थांनी व निलेश लंके प्रतिष्ठाने तीव्र विरोध दर्शविल्याने अखेर प्रशासनाने बांधकाम थांबविण्याचा निर्णय घेतला आहे. जुन्नरचे तहसीलदार सुनील शेळके यांनी संबंधितांना लेखी आदेश देत काम तात्काळ स्थगित करण्याच्या सूचना दिल्या आहे. अशी माहिती माजी सरपंच रविंद्र राजदेव यांनी दिली.

राजदेव म्हणाले, पारनेर व जुन्नर तालुक्याच्या हद्दीवर असणारे पेमदरा येथे सांस्कृतिक व शैक्षणिक आणि सामाजिक कार्यक्रमांसाठी एक कला केंद्र उभारण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मात्र, या प्रकल्पाची पारदर्शक माहिती ग्रामस्थांना दिली गेली नाही. प्रकल्पाचे उद्दिष्ट, शासकीय मान्यता,त्यामागचा उद्देश आणि भविष्यातील धोके याविषयी सुस्पष्टता नसल्याने या कलाकेंद्रा विरोधात पारनेर तालुक्यातील तब्बल १७ गावांनी ग्रामसभा बोलावून ठराव केले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने सावरगाव, गाजदिपूर, काकणेवाडी, कारेगाव, काटाळवेढा, वारणवाडी, पिंपळगाव रोठा, मांडवे खुर्द, नांदूर पठार, म्हसोबा झाप, रेनवडी, वनकुटे तास या गावांचा समावेश असून स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी झाली होती. ठराव घेण्यासाठी निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने उपाध्यक्ष माजी सरपंच रवींद्र राजदेव यांनी पुढाकार घेऊन त्या ठरावाच्या प्रती पारनेरच्या तहसीलदार गायत्री सौदाणे यांच्याकडे सुपूर्द केल्या. जुन्नर तहसीलदारांच्या या निर्णयाचे स्थानिक ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत असून स्थानिक प्रशासनाकडून अधिक चौकशी आणि सुनावणी होण्याची शक्यता आहे.

## हिरव्या चारा बियाणे बँकेतून मिळालं स्वयंपूर्णतेचं यश - अडसुळ यांचा प्रेरणादायी अनुभव



**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.०७, धाराशिव :** देवधानोरा ता.कळंब, जि.धाराशिव बीएसएस मायक्रो फायनान्स लिमिटेडच्या सामाजिक जबाबदारी कार्यक्रमांतर्गत आणि बायफ बीआयएसएलडीच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या हिरव्या चारा बियाणे नर्सरी बँकेचा लाभ घेत गणेश अडसुळ या युवा पशुपालकाने आर्थिक स्वयंपूर्णतेचा आदर्श उभा केला आहे. २०२४-२५ मध्ये बायफ गोविंदपूर केंद्रामार्फत इछ्क-११ हायब्रिड नेपिअर चारा बियाणे मोफत देण्यात आले. या उपक्रमाचा लाभ घेत श्री.अडसुळ यांनी आपल्या शेतातच चारा उत्पादन सुरू केले. त्यांनी बायफ आयोजित प्रशिक्षणात सक्रिय सहभाग घेतला आणि मिळालेल्या मार्गदर्शनाचा योग्य वापर करत एचएफ गायीसाठी सॉर्टेड सिमेनचा वापर करून घरच्या घरी कालवड तयार केली. चाऱ्याच्या उत्पादनामुळे त्यांना पशुखाद्याचा खर्च वाचवता आला. चारा विकत घेण्याची गरजच भासली नाही. परिणामी जनावरांचे आरोग्य सुधारले, दूध उत्पादनात वाढ झाली आणि उरलेल्या चाऱ्याची विक्री करून अतिरिक्त उत्पन्नही मिळवले.श्री.अडसुळ यांनी दाखवलेली पुढाकाराची वृत्ती आणि मेहनतीचा मंत्र आज इतर पशुपालकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागात पशुपालन अधिक फायदेशीर आणि शाश्वत व्यवसाय ठरत आहे. मार्गदर्शन, पुढाकार आणि सातत्याने केलेली मेहनत यामुळे ग्रामीण पशुपालकही आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होऊ शकतात, असा आत्मविश्वास श्री.अडसुळ यांनी व्यक्त केला. बायफ आणि बीएसएस मायक्रो फायनान्सच्या संयुक्त प्रयत्नांमुळे ग्रामीण भागात सकारात्मक बदल घडताना दिसत आहेत.

## ७ ते १४ ऑगस्ट दरम्यान शाळा स्तरावर शैक्षणिक ग्रामसभेचे आयोजन

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०७, खंडाळा (सातारा) :** 'एकजूट' सर्वांगीण शालेय विकासासाठी' ही शैक्षणिक प्रक्रिया हा शिक्षण विभाग (प्राथ.), ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद सातारा व ग्यानप्रकाश फाउंडेशन यांचा संयुक्त उपक्रम आहे. या उपक्रमांतर्गत शाळा स्तरावर दिनांक ०७ ऑगस्ट २०२५ ते १४ ऑगस्ट २०२५ शैक्षणिक ग्रामसभाचे आयोजन करण्यात यावे. सदर शैक्षणिक ग्रामसभेचे नियोजन मुख्याध्यापक,शाळा व्यवस्थापन समिती व सरपंच या माध्यमातून करण्यात यावे. या शैक्षणिक ग्रामसभेत शाळेच्या भौतिक गरजा,विद्यार्थी सुरक्षा व शालेय गुणवत्ता या विषयावर चर्चा करून शाळा विकास आराखडा तयार करून तो गाव विकास आराखड्यात समाविष्ट होईल याची दक्षता घ्यावी.


**कृती कार्यक्रम -**

१)शाळा व्यवस्थापन समिती बैठक- यामध्ये शैक्षणिक ग्रामसभेचे नियोजन करणे.

२) बालसभा

३) एकजूट सर्वांगीण शालेय विकासासाठी शैक्षणिक ग्रामसभा- दिनांक ०७ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट २०२५ शाळा स्तरावर आयोजन करणे. सदर शैक्षणिक ग्रामसभेची माहिती मुख्याध्यापक व ग्रामसेवक यांनी लिंक मध्ये संयुक्तपणे भरणे आवश्यक आहे.

## आ.चित्रा वाघ यांनी नमुंमपा घणसोली निवारा केंद्राची केली पाहणी



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०६, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या समाजविकास विभागामार्फत कार्यान्वित घणसोली येथील बेघर निवारा केंद्र निराधारांचा आसरा म्हणून ओळखले जाते. या केंद्रास आज महाराष्ट्र विधान परिषद सदस्य आमदार चित्रा वाघ यांनी भेट देत तेथील कामकाजाची पाहणी केली व समाधान व्यक्त केले. याप्रसंगी नमुंमपा समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे व कोपरखैरणे पोलीस स्टेशनचे गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उन्मेश थिटे उपस्थित होते. या भेटी दरम्यान आ. चित्रा वाघ यांनी बेघर निवारा केंद्रात राहणाऱ्या लाभार्थी महिलांसोबत संवाद साधून बेघर निवारा केंद्रात मिळत असलेल्या सोयी सुविधांबाबत विचारणा केली. यावेळी त्या महिलांनी सकाळी नाश्ता, दुपारी व रात्री जेवण तसेच आरोग्याची तपासणी व औषधोपचार वेळच्या वेळी केला जातो असे अभिप्राय दिले. या महिलांसोबत चर्चा करताना आ.चित्रा वाघ यांनी या महिलांची पार्श्वभूमी जाणून घेतली तसेच बेघर निवारा केंद्रात येण्याची कारणे समजून घेतली.